सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तेरा दिनांक :- २६ जुलै, २०२२

**प्रसिध्दीपत्रक**

विषय :- राज्य सेवा परीक्षा-२०२२ दिव्यांग व्यक्तींना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.** आयोगामार्फत दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ रोजी आयोजित विषयांकित राज्य सेवा परीक्षा-२०२२ करीता अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह pre-examination@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर दिनांक १० ऑगस्ट, २०२२ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

**३.** ज्या उमेदवारांनी यापूर्वीच विषयांकित परीक्षेसाठी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह सादर केला आहे, अशा उमेदवारांनी परत विनंती अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

**४.** केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेकरिता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यासच लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळेची सवलत देय राहील.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई